पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी ४११ ०१८

मा.विधी समिती

कार्यपत्रिका क्रमांक ९

**<u>सभावृत्तांत</u>**

दिनांक - ०४/१०/२०१३ वेळ - दुपारी ३.०० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा. विधी समितीची पाक्षिक सभा शुक्रवार दिनांक ०४/१०/२०१३ रोजी दुपारी ३.०० वाजता महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

१) मा. जवळकर वैशाली राहुल - सभापती
२) मा. मोटे किरण बाळासाहेब
३) मा. जाधव साधना रामदास
४) मा. शितोळे शैलजा बाबुराव
५) मा. भोईर भाऊसाहेब सोपानराव
६) मा. बारणे निलेश हिरामण

याशिवाय मा.माने – सहा.आयुक्त, मा.गावडे – नगरसचिव, हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

----------

**उपस्थित सन्मा.सदस्यांचे संमतीप्रमाणे खालील ऐनवेळचा विषय सभा कामकाजात दाखल करुन घेणेत आला.**

विषय क्र.११) सभा आयोजनाबाबत – मा.भाऊसाहेब भोईर, मा.किरण मोटे यांचा प्रस्ताव.

----------

उपस्थित सन्मा.सदस्यांच्या संमतीने कार्यपत्रिकेवरील विषय क्र.११, १, २, ३, ४, ५, ६, ७, ८, ९ व १० याप्रमाणे कामकाजाच्या बाबी प्राधान्याने विचारात घेण्यात येतील असे मा.सभापती यांनी प्रकट केले.

**सभाकामकाजामध्ये दाखल करुन घेणेत आलेला विषय घेणेत आला.**

ठराव क्रमांक : ९५ विषय क्रमांक : ११
दिनांक : ०४/१०/२०१३
सुचक : मा.भाऊसाहेब भोईर अनुमोदक : मा.किरण मोटे
संदर्भ : मा.भाऊसाहेब भोईर, मा.किरण मोटे यांचा प्रस्ताव -

पुढील पाक्षिक विधी समिती सभा शुक्रवार दिनांक १८/१०/२०१३ दुपारी ३.०० ऐवजी दुपारी १२.०० वाजता आयोजित करणेत यावी. त्याचप्रमाणे विधी समितीची सभा पहिल्या व ३ -या शुक्रवारी दुपारी ३.०० ऐवजी दुपारी १२.०० वा.आयोजित करणेत यावी. १ ल्या व ३ -या शुक्रवारी सुट्टी / सुट्टया असलेस सुट्टी / सुट्टया नंतरचे कार्यालयीन कामकाजाचे दिवशी विधी समिती सभा आयोजित करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

खालीलप्रमाणे सुचना मांडणेत आली.

सुचक : मा.भाऊसाहेब भोईर                                        अनुमोदक : मा.किरण मोटे

सन्मा.जेष्ठ सदस्य जगदिश शेट्टी यांचे बंधु प्रसाद शेट्टी यांचे दु:खद निधन झालेने त्यांना श्रध्दांजली वाहून आज दि.०४/१०/२०१३ ची सभा शुक्रवार दि.१८/१०/२०१३ रोजी सकाळी ११.४५ पर्यत तहकूब करणेत यावी.

सदर सुचना सर्वानुमते मान्य झाली.

----------

(उपस्थितांनी दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून श्रध्दांजली अर्पण केली.)

**सभापती** – शुक्रवार दि.१८/१०/२०१३ रोजी सकाळी ११.४५ पर्यत सभा तहकूब करणेत येत आहे.

(जवळकर वैशाली राहुल)
**सभापती**
मा. विधी समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८

पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी ४११ ०१८

मा.विधी समिती

कार्यपत्रिका क्रमांक ९

**<u>सभावृत्तांत</u>**

( दिनांक ०४/१०/२०१३ ची तहकूब सभा )

दिनांक - १८/१०/२०१३ वेळ - सकाळी ११.४५ वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा. विधी समितीची दिनांक ०४/१०/२०१३ ची तहकूब सभा शुक्रवार दिनांक १८/१०/२०१३ रोजी सकाळी ११.४५ वाजता महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

१) मा. जवळकर वैशाली राहुल - सभापती
२) मा. मोटे किरण बाळासाहेब
३) मा. काळभोर वैशाली जालिंदर
४) मा. जाधव साधना रामदास
५) मा. प्रशांत शितोळे
६) मा. शितोळे शैलजा बाबुराव
७) मा. भोईर भाऊसाहेब सोपानराव
८) मा. बारणे निलेश हिरामण

याशिवाय मा.टेकाळे, मा.खांडकेकर, मा.दुरगुडे – सहा आयुक्त, मा.गावडे – नगरसचिव, मा.जुंधारे – कार्यकारी अभियंता, हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

----------

ठराव क्रमांक : ९६ विषय क्रमांक : १
दिनांक : १८/१०/२०१३ विभाग : अ प्रभाग स्थापत्य
सुचक : मा.प्रशांत शितोळे अनुमोदक : मा.किरण मोटे
संदर्भ : मा.महापालिका आयुक्त यांचेकडील क्र.अप्र/स्था/३/कावि/१४९२/२०१३, दि.१३/०८/२०१३

विषय - निगडी से.क्र.२२ येथील गुरुदत्त उद्यानाचे नुतनीकरण करणे या कामातून अ प्रभागातील इतर उद्यानांची देखभाल दुरुस्तीची कामे करणेबाबत.(साईट बदल)

विषय क्रमांक १ चा विचार पुढील सभेच्यावेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक : ९७ विषय क्रमांक : २
दिनांक : १८/१०/२०१३ विभाग : स्थापत्य बीआरटीएस
सुचक : मा.भाऊसाहेब भोईर अनुमोदक : मा. शैलजा शितोळे
संदर्भ : मा.महापालिका आयुक्त यांचेकडील क्र.स्था/बीआरटीएस/५९७/२०१३, दि.२२/०८/२०१३

विषय - जुन्या मुंबई पुणे रस्त्यावरील भक्ती-शक्ती चौक येथे बस टर्मिनल विकसित करणे.

मा.आयुक्त यांचे मागणी पत्र स्था/बीआरटीएस/६६९/१३, दि.२७/०९/२०१३ नुसार मा.आयुक्त यांना त्यांचे विषयपत्र मागे घेण्यास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक : ९८ विषय क्रमांक : ३

दिनांक : १८/१०/२०१३ विभाग : स्थापत्य बीआरटीएस

सुचक : मा.प्रशांत शितोळे अनुमोदक : मा. साधना जाधव

संदर्भ : मा.महापालिका आयुक्त यांचेकडील क्र.स्था/बीआरटीएस/६०३/२०१३, दि.२६/०८/२०१३

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपाचे बीआरटीएस विभागाकडील विषयपत्रानुसार औंध रावेत रस्त्यावरील मुकाई चौक येथे बस टर्मिनल विकसित करणेच्या कामाचे सार्वजनिक बांधकाम खाते यांचेकडील सन १२-१३ च्या दरसूचीनुसार अंदाजपत्रक तयार केले आहे. सदर कामाची अंदाजपत्रकीय र.रु.१,३०,३५,०००/- इतकी आहे. सदर काम पूर्ण करणेस एकूण १२ महिन्यांचा कालावधी लागणार आहे. सदरचे कामास सन २०१३-१४ मध्ये एकूण २,९०,००,०००/- इतकी तरतूद करणेत आलेली आहे.(पानांक ४८ अ.क्र.१४/१३७) सदर बस टर्मिनलचे क्षेत्रफळ ९२० चौ.मी. असून त्यामध्ये खालील बाबींचा समावेश आहे. १) बांधकामाचा प्रकार-वीट बांधकाम २) छताचा प्रकार- GI Sheet ३) Flooring - Anti Skid flooring ४) भिंतीस Aluminum Cladding ५) Control Room ६) Ticket Counter ७) Separate Platform for BRT & Private buses ८) Rest Room for bus Driver ९) Waiting area for passengers १०) Parking for private vehicles ११) Toilet block याकामी येणा-या र.रु.१,३०,३५,०००/- (अक्षरी र.रु.एक कोटी तीस लाख पस्तीस हजार फक्त) चे खर्चास प्रशासकीय मान्यता देणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा. महापालिका सभेकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक : ९९ विषय क्रमांक : ४

दिनांक : १८/१०/२०१३ विभाग : विद्युत मुख्य कार्या.

सुचक : मा.किरण मोटे अनुमोदक : मा. शैलजा शितोळे

संदर्भ : मा.महापालिका आयुक्त यांचेकडील क्र.सशअ/३१५/२०१३, दि.२७/०८/२०१३

विषय - पिंपरी चिंचवड शहराचे सांस्कृतिक आणि कला धोरणाबाबत.

विषय क्रमांक ४ चा विचार पुढील सभेच्यावेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक : १०० विषय क्रमांक : ५

दिनांक : १८/१०/२०१३ विभाग : भूमि आणि जिंदगी

सुचक : मा.प्रशांत शितोळे अनुमोदक : मा. शैलजा शितोळे

संदर्भ : मा.महापालिका आयुक्त यांचेकडील क्र.भूजि/१/कावि/३४८/२०१३, दि.०३/०९/२०१३

विषय - पिंपरी चिंचवड महानगरपालिका मिळकत वाटप नियमावली २०१३ मान्यतेबाबत.

विषय क्रमांक ५ चा विचार पुढील सभेच्यावेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक : १०१ विषय क्रमांक : ६
दिनांक : १८/१०/२०१३ विभाग : प्रशासन
सुचक : मा.वैशाली काळभोर अनुमोदक : मा. शैलजा शितोळे
संदर्भ : मा.महापालिका आयुक्त यांचेकडील क्र.प्रशा/१/कावि/१२५०/२०१३, दि.१३/०९/२०१३

विषय - जेष्ठ वैद्यकीय अधिकारी पदावर पदोन्नतीने करावयाच्या नेमणूकीस मान्यता मिळणेबाबत.

विषय क्रमांक ६ चा विचार पुढील सभेच्यावेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक : १०२ विषय क्रमांक : ७
दिनांक : १८/१०/२०१३ विभाग : पर्यावरण अभियांत्रिकी
सुचक : मा.निलेश बारणे अनुमोदक : मा. वैशाली काळभोर
संदर्भ : मा.महापालिका आयुक्त यांचेकडील क्र.पअक/२/कावि/७५२/२०१३, दि.१७/०९/२०१३

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपाचे सन २०१३-१४ चे अंदाजपत्रकातील पान क्र.७७१ अ.क्र.२१ मधील मोशी कचरा डेपो येथे जुन्या कच-यावर व एस.एल.एफ.क्लोजर करता यापुर्वी केलेल्या कॅपिंगवर सोलर फार्मिंग करुन विद्युत निर्मिती करणे या कामाचे ( अंदाजपत्रकीय र.रु.१०.०० कोटी व तरतुद र.रु.५.०० लाख) ऐवजी मोशी कचरा डेपो येथे सॅनिटरी लॅन्डफिल साईट टप्पा २ विकसित करणेचे काम करणेस मान्यता असलेस अंदाजपत्रकीय किंमत र.रु.१२.५० कोटी रकमेस प्रशासकीय मान्यता मिळणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा. महापालिका सभेकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक : १०३ विषय क्रमांक : ८
दिनांक : १८/१०/२०१३ विभाग : प्रशासन
सुचक : मा.भाऊसाहेब भोईर अनुमोदक : मा. प्रशांत शितोळे
संदर्भ : मा.महापालिका आयुक्त यांचेकडील क्र.प्रशा/१/कावि/१२५७/२०१३, दि.१७/०९/२०१३

विषय - श्री.खांडकेकर प्रशांत शरद, मुख्याधिकारी (गट-अ) यांचे सहा.आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका या पदावरील नियुक्तीबाबत.

विषय क्रमांक ८ चा विचार पुढील सभेच्यावेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक : १०४ विषय क्रमांक : ९
दिनांक : १८/१०/२०१३ विभाग : पाणीपुरवठा
सुचक : मा.साधना जाधव अनुमोदक : मा. वैशाली काळभोर
संदर्भ : मा.महापालिका आयुक्त यांचेकडील क्र.पापु/बप्र/१५/३९३/२०१३, दि.२१/०९/२०१३

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

रावेत येथील अशुध्द जलउपसा केंद्राच्या परिसरात विद्युत विभागाकरिता स्विचींग स्टेशन बांधणेकामी येणा-या र.रु.५८,८०,७८६/- ( अक्षरी र.रु.अठ्ठावन्न लाख ऐंशी हजार सातशे शहाऐंशी

फक्त ) चे पुर्वगणनपत्रकास व त्याप्रमाणे काम करण्यास मान्यता देणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणची वाट न पाहता ठराव मा. महापालिका सभेकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक : १०५ विषय क्रमांक : १०

दिनांक : १८/१०/२०१३ विभाग : विद्युत

सुचक : मा.किरण मोटे अनुमोदक : मा. शैलजा शितोळे

संदर्भ : मा.विकास अभियंता (वि/यां) यांचेकडील क्र.प्र वि/जा/७९०/२०१३, दि.-------

मा.विकास अभियंता (वि/यां) यांनी शिफारस केलेप्रमाणे -

प्रभाग क्र.२९ इंद्रायणीनगर मधील पवना संस्था ते उष:किरण हॉटेल ते संकेत हॉटेल रस्त्यावर दिवे बसविणेकामी येणा-या र.रु.१५,००,०००/- (अक्षरी र.रु.पंधरा लाख फक्त) चे पुर्वगणनपत्रकास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहीर केले.

(जवळकर वैशाली राहुल)
**सभापती**
मा. विधी समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८ नगरसचिव कार्यालय
क्रमांक - नस/४/कावि/ ९७४ /२०१३
दिनांक - २१/१०/२०१३

नगरसचिव
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

प्रत - सर्व संबंधीत शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकडे पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.